Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.नं. ८३२–ए, फा. प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे–४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.म./परीक्षा–३/1532
225
पुणे ४११००४
दिनांक –18/०४/२०२४
24

प्रति

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय – इ. १०वी व इ. १२वी परीक्षेस शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास मंडळ मान्यता नसलेला विषय खाजगीरित्या अध्ययन करुन स्वत:च्या जबाबदारीवर विद्यार्थ्यास प्रविष्ट होण्याची परवानगी देण्याबाबतच्या सध्याच्या धोरणात सुधारणा करणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन सूचित करण्यात येते की, इ. १०वी व इ. १२वी परीक्षेस शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास मंडळ मान्यता नसलेला विषय खाजगीरित्या अध्ययन करुन स्वत:च्या जबाबदारीवर विद्यार्थ्यास प्रविष्ट होण्याची परवानगी देण्याबाबतच्या सध्याच्या धोरणात सुधारणा करणेच्या अनुषंगाने ज्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात विषय अध्यापनाची सोय नाही, अशा विषयांना खाजगीरित्या अध्ययन करण्याबाबतचा विषय दिनांक ०१/११/२०२३ रोजीच्या कार्यकारी परिषदेत सादर केला असता खालील शिफारशीनुसार ठराव संमत झाला आहे –

१ सद्यस्थितीत दि. ०१/१०/१९९४ व दि. ३०/०१/२००६ च्या कार्यकारी परिषदेच्या ठरावानुसार कार्यवाही सुरु आहे, ती कायम ठेवण्यात यावी.

२ विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेत इतर शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात विषय शिकवला जात असेल तरच परवानगी देण्यात यावी याबाबत सभेमध्ये चर्चा होऊन, अशी अट ठेवता येणार नाही, असे ठरले.

३ तोंडी, प्रात्यक्षिक, श्रेणी व अंतर्गत मुल्यमापनाची जबाबदारी संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयावर सोपवावी, तसे हमीपत्र प्रस्तावासोबतच घ्यावे.

४ अशा विषयांना परवानगी घेण्यासाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी त्या शैक्षणिक वर्षाच्या ३१ ऑगस्टपूर्वी प्रस्ताव पाठवून विभागीय मंडळाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

५ सदर प्रस्तावांसोबत प्रति विद्यार्थी रु. २०००/– इतके शुल्क आकारणी करावी.

तरी उपरोक्त ठरावाची नोंद घेऊन सदर बाब परिपत्रकान्वये सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावी व फेब्रु–मार्च २०२५ परीक्षेपासून प्रस्तावित शुल्क आकारुन यथानियम कार्यवाही करण्यात यावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ०४.

प्रत माहितीस्तव – श्री. केतकर वि. त्रि., छत्रपती संभाजीनगर.

E:\Pardeshi1\SwaAdhyayan.docx2

क्र.नाविमं/माध्य.ब-१/225
नाशिक ४२२००३
दि.२२/०४/२०२४
24

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालय, नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

उपरोक्त राज्यमंडळाच्या पत्रानुसार कळविण्यात येते कि, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च २०२५ पासून इ.१२ वी परीक्षेस शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास मंडळ मान्यता नसलेला विषय खाजगीरित्या अध्ययन करून स्वतच्या जबाबदारीवर विद्यार्थ्यास प्रविष्ठ होण्याची परवानगी देण्याबाबत सध्याच्या धोरणात सुधारणा करणेबाबत शिफारशीनुसार ठराव संमत करण्यात आलेला आहे, सदर पत्रानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

(मोहन देसले)
विभागीय सचिव,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक

SSC B1